सन २०१९ मधील ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत "वृक्षलागवड व संगोपन" यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जलसं-२०१९/प्र.क्र.१७१/जल-७**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२**
**दिनांक : ०३ ऑगस्ट, २०१९.**

**वाचा:**

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावर्वि-२०१६/प्र.क्र.१३१/फ-११, दि. ३१/०३/२०१६
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावर्वि-२०१६/प्र.क्र. ८०/फ-११, दि. १०/१०/२०१६
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावर्वि-२०१६/प्र.क्र.८० (भाग-२)/फ-११, दि. २५/०७/२०१८
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: सावर्वि-२०१८/प्र.क्र. १४४/फ-११, दि. ०६/०९/२०१८
५) मृद व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: जलसं-२०१७/प्र.क्र. ५७८/जल-७, दि.१९/१२/२०१७
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८/०७/२०१९.

**प्रस्तावना:**

हरित महाराष्ट्र संकल्पनेंतर्गत सन २०१९ मध्ये दिनांक ०१ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत ३३ कोटी वृक्षारोपन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नियोजित वृक्ष लागवड व संगोपन यासाठी लागणा-या निधीची आवश्यकता लक्षात घेऊन महसुल व वन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २५/०७/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक प्रशासकीय विभागांना दरवर्षी उपलब्ध होणा-या एकंदरित अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी "कार्यक्रमावरील खर्चामधून" ०.५ टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत विभागास निश्चित करून देण्यात आलेले ४.८९ लक्ष वृक्षारोपनाचे उद्दिष्ट्य साध्य करण्याच्या दृष्टीने "वृक्षलागवड व संगोपन" यासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महसुल व वन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०६/०९/२०१८ अन्वये सन २०१९ च्या पावसाळ्यात करावयाच्या नियोजित ३३ कोटी वृक्ष लागवडीचे विभागनिहाय, जिल्हानिहाय व यंत्रणानिहाय उद्दिष्ट्य वाटप करण्यात आले असुन त्यानुसार मृद व जलसंधारण विभागास एकुण ४,८८,६५० वृक्षारोपनाचे उद्दिष्ट्य निश्चित करून देण्यात आले आहे. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी दिनांक ०१ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या "वन महोत्सव" कालावधीमध्ये करावयची असुन वृक्षारोपन कार्यक्रम राबविण्याकरिता **रु. ३००.०० लक्ष (रुपये तीन कोटी फक्त)** निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे .

**२.** मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत वृक्षारोपनाचे महसुली विभागनिहाय उद्दिष्ट्य वाटप व निधी वितरण विवरणपत्र खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **महसुली विभाग** | **सन २०१९ साठीचे वृक्षारोपनाचे उद्दिष्ट्य** | **वितरीत करावयाचा निधी (रु. लक्ष)** |
|---|---|---|---|
| १. | कोकण विभाग | २५०० | १.५० |
| २. | पुणे विभाग | १३,०५० | ८.०० |
| ३. | नाशिक विभाग | ८१,७०० | ५०.०० |
| ४. | औरंगाबाद विभाग | १,१३,१०० | ७०.०० |
| ५. | अमरावती विभाग | १,०७,१५० | ६५.५० |
| ६. | नागपूर विभाग | १,७१,१५० | १०५.०० |
| **एकुण** | | **४,८८,६५०** | **३००.००** |

**३.** सदर निधी कोषागारातून आहरीत करण्याकरिता संबंधित **"प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग"** यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच **"अप्पर आयुक्त(जलसंधारण), पुणे"** यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. याबाबतचा खर्च "**मागणी क्रमांक झेडएच-३, २४०६, वनीकरण व वन्यजीव, ०४, वनीकरण व पर्यावरण विकास, १०१, राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००), (००) (०१) शाश्वत विकास ध्येय (ध्येय-१५ जमिनिवरील सजीव) अंतर्गत वृक्ष लागवड आणि संवर्धन (१०० टक्के) (राज्य योजना) (कार्यक्रम), ०२ मजुरी, २१ पुरवठा व सामुग्री (२४०६ए४५२)"** या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा. उपरोक्त वितरीत निधीपैकी ३० टक्के निधी "०२,मजुरी" करिता आणि ७० टक्के निधी "२१, पुरवठा व सामुग्री" यासाठी खर्च करावी.

**५.** नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी ही तरतूद **"वृक्षलागवड व संगोपन"** यासाठीच खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदर वितरित निधी महसुल व वन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहुन खर्च करण्यात यावा.

**६.** महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०९/२०१८ अन्वये सन २०१९ च्या पावसाळ्यात करावयाच्या नियोजित ३३ कोटी वृक्ष लागवडीचे विभागांतर्गत जिल्हानिहाय उद्दिष्ट्य वाटप करण्यात आले असुन त्यानुसार संबंधित महसुली विभागातील जिल्ह्यांना निश्चित करुन देण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या उद्दिष्टाच्या प्रमाणात संबंधित "**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग"** यांना "अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप व संनियंत्रण प्रणालीवर (बिम्स)" (आहरित करून वर्ग न करता) निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित "प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग" यांची राहील.

**७.** वितरीत निधीची अप्पर आयुक्त (जलसंधारण), पुणे यांनी प्रतिस्वाक्षरित केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करण्याची जबाबदारी संबंधित “प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग” यांची राहील.

८. संबंधित जिल्हा जलसंधारण अधिका-यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतुद तात्काळ खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी. खर्च ताळमेळ व इतर वित्तीय बाबींच्या समन्वयाची जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. वितरीत निधी इतर कोणत्याही बाबींसाठी उपलब्ध करुन देता येणार नाही व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदीमधून झालेल्या खर्चाचे गावनिहाय, यंत्रणानिहाय विवरणपत्र शासनास सादर करावे.

९. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८/०७/२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत असुन या परिपत्रकातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०३११०७३८६७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2019.08.03 16:51:07 +05'30'

**( सु. द. नाईक )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव.
३. मा.सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव
४. मा अध्यक्ष, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
६. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य
७. मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१३. आयुक्त, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, वाल्मी, औरंगाबाद.

१४. अप्पर आयुक्त (जलसंधारण), पुणे
१५. संचालक,मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
१६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१९. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, नागपूर
२०. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२२. सर्व जिल्हाधिकारी
२३. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
२४. सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण
२५. सर्व वनसंरक्षक
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२७. महालेखापाल ½ , महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३०. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
३१. सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
३२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३३. सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारन विभाग
३४. सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा.), जिल्हा परिषद.
३५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३६. सर्व मंत्रालयीन विभाग
३७. वन विभाग/फ-११, मंत्रालय, मुंबई.
३८. जल-७, निवड नस्ती.